फौ. कि. अर्ज .क्र.३५/२०२५
निकिता वि. जय
नि.क्र. ९ खाली

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र.१ शपथेवर सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करते की,

**माझे नाव** : निकिता जय लिंबाने,

**माझे वय** : २४ वर्षे, **व्यवसाय** : घरकाम,

**राहणार** : अंबेलोहोळ, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.

**गैरअर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम. बी. गुडदे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु.**

माझे शिक्षण बीए च्या द्वीतीय वर्षापर्यंत झाले आहे. माझ्या लग्नाची तारीख २१.०४.२०२४ आहे. माझे सध्यादेखील शिक्षण चालू आहे. त्यासंदर्भात मी कागदपत्र दाखल केलेले नाहीत. मला कोणत्याही प्रकारचा गंभीर स्वरुपाचा आजार नाही. तसेच मी कधीही सतत आजारी पडत नाही. माझे लग्न बौध्द धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, हुंडा देण्याघेण्याची कोणतीही प्रथा नाही. आमचे लग्न जुळण्यापूर्वी माझा बायोडेटा गैरअर्जदार यांना देण्यात आला होता. साक्षीदार यांना त्यांचा बायोडेटा दाखवण्यात आला. हा तोच आहे जो मी लग्नाच्या पूर्वी गैरअर्जदार यांना दिला होता. त्यातील मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यामध्ये टेलरींग व ब्युटीपार्लरचा कोर्स केल्याबाबतचे खरे लिहीले आहे. माझे वडील मजुरी करतात. तसेच माझे वडील राजकीय नेते आहेत. माझ्या लग्नाच्या वेळी माझ्या वडीलांची आर्थिक परीस्थिती ठीक होती. माझ्या सासरकडील परिस्थिती माझ्या वडीलांच्या परिस्थीतीपेक्षा चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, आमचे लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार व मी नेहमी बाहेर फिरायला जायचो. साक्षीदार यांना गैरअर्जदार यांनी दाखल केलेला फोटो दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरील फोटो हा गैरअर्जदाराचे सोबत मी जेवायला बाहेर गेलो होतो त्याचा आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझ्या वडीलांनी सर्व कुटुंबाला जेवायला नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, इतर फोटोमध्ये

गैरअर्जदारांनी मला फिरायला बाहेर घेवून गेल्याबाबतचे फोटो दिसत आहेत. तसेच गैरअर्जदारांनी मला गौताळा अभयारण्य येथे, सिध्दार्थ गार्डन, कर्णपूरा मंदीर व सातारा येथील खंडोबा मंदीर येथे फिरायला बाहेर घेवून गेल्याबाबतचे फोटो दिसत आहेत. मी प्रस्तुतचे प्रकरण हे गैरअर्जदार यांच्याकडून पोटगी मिळणेकामी दाखल केले आहे व या प्रकरणात एकूण ४ गैरअर्जदार आहेत. आता साक्षीदार यांना प्रस्तुत प्रकरणाची निशाणी क्र. १ ची सर्टीफाइड प्रत दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ दिसून येतात.

प्रश्न – प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यापूर्वी तुम्ही वाचले नव्हते

उत्तर – मी वाचले होते, मी गोंधळले होते.

हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मला त्यामध्ये काय काय लिहीले हे मला माहीत नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत व समक्ष,

SHAIKH MOHSIN ASLAM

Digitally signed by SHAIKH MOHSIN ASLAM
Date: 2026.03.18 12:50:20 +0530

दिनांक :–१२.०३.२०२६

(एम. ए. शेख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गंगापुर.